REIKI VIDYA NIKETAN

सर्वेः सन्तु निरामयाः

रेकि ब्रह्म

वर्ष ९वे अंक ६वा । मार्च २०२१



त्याला भेटण्याच्या निमित्ताने त्याची लेकरे स्वतःची चेतना तिथल्या उंचीवर नेऊ शकतील; जेथून त्यांना आयुष्याची सगळी वळणे नीट दिसू शकतील. त्यांचा दृष्टीकोन वाढेल. नाहीतर त्याला आपल्याला पहाण्याकरिता तर डोळे उघडण्याचीही गरज नाही. त्याने त्याची जागा सुद्धा आपल्या लेकरांचाच विचार करुन ठरवली.

न्याय आणि अन्यायाची कल्पना

जेथे पहावे तेथे हलकल्लोळ चाललेला दिसतोय. आणि मी काही येथे वातावरणातील किंवा कोरोना संबंधित गोंधळाचा विचार करत नाही. मी मानवी समाजातील उद्रेकाबद्दल विचार करतोय. मग तो कोणताही देश असो, कोणताही प्रांत असो, कोणताही प्रदेश असो. सगळीकडेच हिंसक आंदोलने चालली आहेत, जणू काही हवेतच संघर्ष पसरतोय. आपल्यावर अन्याय होतो आहे असे मानायचे आणि जाळपोळ करून सामाजिक मालमत्तेचे व्यर्थ नुकसान करायचे. ह्यातील कोणालाही थांबवून विचारले तर कोणीच सांगत नाही कि त्यांच्यावरील अन्यायाचे स्वरूप काय आहे. अन्यायाची ही अवस्था तर मग न्यायाची कल्पना तरी धुरकट आणि अस्पष्ट असली तर नवल नाही.

आजकालच्या परिस्थितित प्रत्येक जण आपल्या प्रतिक्रिया अशा दाखवतोय कि त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. मला समजत नाही कि ह्या न्याय आणि अन्यायाच्या व्याख्या कोणी आणि कशा करायच्या? माझे असे मत आहे कि न्याय आणि अन्याय ह्या केवळ मानवी संकल्पना आहेत, तो एक दृष्टीकोन आहे. आपण कोठल्या कोनातून एखाद्या घटनेकडे पाहत आहोत त्यावरती आपला दृष्टीकोन अवलंबून असतो. कोन बदलला कि दृष्टीकोन बदलतो. स्थान बदलले कि कोन बदलतो. बऱ्याच वेळा आपण आपली जागा सोडायला तयार नसतो. कारण आपलाच अहंकार आपल्याला कडक बनवतो. आपली लवचिकता संपून जाते. मग आपण एकाच कोनामध्ये आणि एकाच दृष्टीकोनामध्ये अडकतो. मग नशीबी येते ते फक्त पर्यायांशिवायचे जीवन. जीवन प्रवाह मग एकाच ठिकाणी कोंडवटतो. आयुष्याच्या विविध अनुभवांना सामोरे जाणे बंद होते. हीच आयुष्याची घुसमट आणि त्या घुसमटीतून येणारी अन्यायाची भावना. अन्यायाची भावना जोपासणे फार सोपे असते कारण अन्यायाच्या भावनेत स्वत:वर कसलीच जबाबदारी नसते. सगळा दोष जगाचा असतो. मग जगाने पाहीजे तर सुधारावे, स्वत:ला आपल्याला मात्र सुधारण्याची ना गरज वाटत ना जबाबदारी घ्यायची. एकदा का लवचिकतेची सवय लागली कि मग कोठलीही घटना ३६० डिग्रींमधून पाहण्याची सुरूवात झाली. मग आभासांना स्थान नाही. कोनाबरोबर दृष्टी विस्तारली कि अन्यायाची भावना संपली. अन्यायाच्या भावनेला जन्म देणारे अज्ञान संपले कि आयुष्यात न्याय–अन्यायाच्या चक्रातून आपण मुक्त झालो. मग आपण सगळ्या जगासाठी विश्वामित्राची भूमिका बजावू शकतो.

बऱ्याच वेळेला माझ्या शिबिरांमध्ये हे मी अनुभवत असतो कि माणसे आपल्या धारणांवर अवलंबित न्याय निवाडा करत असतात. मला असे वाटते आणि एखादी गोष्ट असणे यात फरक असू शकतो हे बऱ्याच लोकांना पटतच नाही. त्यांचा अहंकार त्यांना इतर पर्यायांपासून दूर ठेवतो. ते कोठलीही गोष्ट पूर्ण जाणून घेतल्याशिवायच आपल्या प्रतिक्रिया देत असतात आणि त्यांचा अहंकार त्यांना सत्याची जाणिव होऊ देत नाही. अहंकाराचा एक स्वत:चा अजेंडा असतो. त्यात सत्याला स्थान नसते. आपल्या स्वत:च्या न्याय–अन्यायाच्या व्याख्या स्वरचित असतात. त्यांना दुनियेच्या व्याख्यांशी काहीच देणे घेणे नसते. परिघात राहून ते केंद्रबिंदुबद्दल मते बनवत असतात. समुद्राच्या किनाऱ्यावर उभे राहून आपल्याला समुद्राची खोली कळते असे त्यांना ठाम वाटत असते. त्यांची मोजमापेच वेगळी असतात. आपण प्रत्येक गोष्ट जाणत नसतो पण प्रत्येक गोष्टीवर प्रतिक्रिया मात्र देत असतो. बऱ्याच वेळेला हे हास्यास्पद होऊ शकते. पण त्यांना त्याची फिकीर नसते. आमच्या बऱ्याचशा महिला शिबिरांमध्ये हा अनुभव मी घेत असतो. महिलांवर अन्याय होतोय हे ठामपणे मानणाऱ्या स्त्रियांकडे स्वत:चे अनुभव

बहुतांशी नसतातच. आणि त्यांची ही मते केवळ एखाद्या व्यक्तीमत्वावर नसतात तर सगळ्या जगालाच त्यात सामिल करणारी असतात. त्यात तारतम्य नसते. परंतु जेव्हा मी त्यांना काही सत्ये समजावतो त्यावेळेला त्यांना त्यांची चूक लक्षात येते. अगदी आपल्या अन्यायाच्या तराजून त्यांनी परमेश्वराला सुद्धा दोषी ठरवलेले असते त्यावेळेला न्याय देवता आंधळी असते असे का मानतात हे लक्षात येते. ज्या महिलांना प्रज्ञेने भरलेले आज्ञा चक्र, प्रेमाने भारलेले अनाहत चक्र आणि प्रशांतिने सजलेले स्वाधिष्ठान चक्र परमेश्वराने वरदहस्ताने दिले आहे त्यांनी तरी त्या परम पवित्र परमेश्वरावर दोषारोप का करावेत? प्रसूतिकालात गायत्री मंत्राच्या उच्चारांवर नियंत्रण ठेवण्यास सांगणारे शास्त्र आपल्याच गर्भातील लेकराला इजा होऊ नये याची काळजी घेत आहे ही समज मंत्रोच्चारांसाठी अधिकार मागणाऱ्या महिला समाजाला का येऊ नये? मासिक पाळीच्या काळात देवा धर्माच्या कार्यात असलेली नियंत्रणे त्या काळातील दूषित रक्ताचा प्रवाह हृदयाकडे वळू नये म्हणून असतात ह्या सत्याला महिला कधी सामोरे जाणार? महिलांमधली एखादी श्रीमति सिनू जोसेफ जागृत होऊन हे सत्य समोर मांडत असताना इतर स्त्रियांनी कान व डोळे का झाकावेत? सुगंधी द्रव्यांच्या जाहिरातीतील एखाद्या ऐऱ्या गैऱ्या पुरूषाने अंगावर अत्तराचा स्प्रे मारल्यावर धावत येऊन बिलगणाऱ्या जाहिरातीतील शेकडो महिला हा महिलांचा अपमान आणि त्यांच्यावरचा अन्याय नाही का? मग त्याविरूद्ध आंदोलन छेडणाऱ्या महिला संस्था कोठे शोधायच्या? गुन्हेगाराला जात पात नसते त्यामुळे पोलिसांनी रंगे हात पकडलेल्या गुन्हेगाराला जातीचे लेबल लावून त्या जातीवर अन्याय होतोय असा टाहो फोडताना आपण चांगल्या समाजाची सुरक्षा धोक्यात आणत आहोत याची जाण स्वत:ला सुज्ञ म्हणवणाऱ्या समाजाला का नसावी?

माझी साधी आणि सोपी अपेक्षा माझ्या साधकांकडून एवढीच आहे कि आपल्या चैतन्याला एवढ्या उंचीवर नेऊन ठेवा कि जेथून कोठल्याही घटनेचा परिपूर्ण अनुभव घेत ह्या न्याय अन्यायाच्या चक्रातून आता बाहेर पडा. कदाचित जन्म मृत्युच्या चक्राला सगळ्यात मोठे कारण हेच असावे. ह्या चक्राचे भेदन हाच तुमचा मोक्ष.

प्रेम, प्रकाश आणि रेकिसह

अजित सर

फेब्रुवारी २८, २०२१

(भाग ४०वा)

तेलंग स्वामी

एक अद्भुत अस्तित्व

अनुवादक – सौ. शुभदा गर्गे, नाशिक

काशीत भवानीचरण वाचस्पति नावाचे गहस्थ होते. ते बरीच वर्षे आजारी होते. शारिरीक व मानसिक व्याधींनी ग्रस्त होते. मित्रांच्या सांगण्यावरून ते स्वामीजींकडे आले व रोगमुक्त करण्याची विनंती केली.

सर्व काही ऐकल्यावर स्वामीजींनी त्यांना भांग वाटण्यास सांगितले.

वाचस्पति पाटा–वरवंटा घेऊन भांग वाटू लागले. वाटून झाल्यावर मटार दाण्याएवढी गोळी करून स्वामीजींनी त्यांना खाण्यास सांगितले व म्हणाले, “रोज याचवेळी येथे येत जा. भांग वाटायची व खायची.”

वाचस्पति हे ऐकून चकित झाले. त्यांना माहित होते की हे बाबा, साधु–संत, भांग–गांजा इ. खातात; परंतु जो खात नाही त्याला पण जबरदस्तीने देतात हे त्यांना नवीन होते. तरी ते रोज येत, भांग वाटत, छोटी गोळी खात व परत जात. एक महिना हा क्रम सुरु होता. एक दिवस ते येताच स्वामीजींनी उलटी केली व त्यांना स्वच्छ करण्यास सांगितले. त्यानुसार वाचस्पतिंनी काहीही कुरकुर न करता सर्व स्वच्छता केली व भांग वाटू लागले.

ह्याच प्रकारे काही दिवसांनी स्वामीजींनी शी केली व वाचस्पतिंना साफ करण्यास सांगितली. याही वेळी कुरकुर न करता त्यांनी सर्व काही स्वच्छ केले, भांग वाटली व खाल्ली.

दुसऱ्या दिवशी भांगेची गोळी देऊन स्वामीजींनी वाचस्पतिंना सांगितले, “आता उद्यापासून येऊ नका.”

“का स्वामीजी?” स्वामीजी म्हणाले, चार दिवसांनी तुम्ही पूर्ण बरे व्हाल. त्याचकरता तर येथे येत होता ना?

चार दिवसांनी वाचस्पती पूर्ण बरे झाले.

उमाचरणजींना ज्या औषधाच्या कंपनीत काम करत होते, तेथे एक मजेशीर घटना घडली. कंपनीचे मॅनेजर महेंद्रनाथ घोष म्हणाले, “उमाचरण हिशोबात सहाशे रुपयांची तुट आहे जरा बघ, पैसे कोणाला जास्ती दिले गेले की लिहीताना चुक झाली.”

कंपनीचा सर्व हिशोब ठेवणे व पैशाची देवाण–घेवाण करणे ह्या दोन्ही जवाबदाऱ्या उमाचरणजी व घोषसाहेब ह्या दोघांवर होत्या. उमाचरणजी ज्या खोलीत रहात होते तेथेच कार्यालयाच्या सर्व किल्याही ठेवलेल्या असत. दोघांनीही सर्वत्र खूप शोधाशोध केली, परंतु तुटीचा तपास काही लागला नाही. दोघांनाही एकमेकांवर पैसे चोरल्याचा संशय येऊ लागला. तीन महीने उलटून गेले पण काहीही तपास लागला नाही. कामापेक्षा पैशाच्या चिंतेने दोघेही हवालदील झाले होते.

ह्या सर्व गोष्टींना व मनस्तापाला कंटाळून उमाचरणजी काशीला गेले. त्यांनी विचार केला की स्वामीजींना सर्व सांगून काही मार्ग निघतो का बघता येईल.

आश्रमात येऊन स्वामीजींना नमस्कार करून ते बसत नाही तोच स्वामीजी म्हणाले, “कार्यालयात पैशाची गडबड करून येथे शोध घ्यायला आलास होय?”

उमाचरणजींना स्वामीजींचा मनकवडेपणा माहीत होता. ते हळूच म्हणाले, “हो”.

स्वामीजी म्हणाले, “तू व तुझा सहकारी दोघेही सारखेच बेजवाबदार व निष्काळजी आहात. अमुक महीन्याच्या अमुक तारखेला पाचशे रुपये पाठवले गेले – कलकत्याच्या नरसिंह दत्तांना तीनशे रुपये व स्टैनिस्ट्रीट कंपनीला दोनशे रुपये.

तू ड्राफ्ट बनवून त्याची नोंदही केली होतीस. पावती अमुक फाईल मधे आहे. त्या लोकांनी पैसे मिळाल्याची पावतीही पाठवली होती. तीही फाईलमधे आहे. पण दोन्ही रकमांची नोंद झाली नाही. रहाता राहीला शंभर रुपयांचा प्रश्न. त्याचा हिशोब घोष महाशय स्वत:च देतील.

यानंतर स्वामीजी एकदम रागावून बोलले, “माझ्याबद्दल कुठेही व कोणाशीही काही बोलण्यास मी तुला मनाई केली होती ना? आणि तू मुंगेरला जाऊन सरळ प्रचार केलास आणि आता बरेच लोक दिक्षा घ्यायला येथे येतात. मी वैतागलो आहे ह्या गोष्टीला. आता तू मुंगेरला राहू शकणार नाहीस. येथून परत गेल्यावर – चीफ इंजिनियर शिलॉंग, आसाम – या पत्यावर एक अर्ज पाठवून दे. त्यांचे उत्तर येताच तेथे निघून जा.

उमाचरणजी म्हणाले, “स्वामीजी मी प्रचार नाही केला. फक्त माझ्या दोन–चार मित्रांना तुमच्याबद्दल सांगितले होते.”

स्वामीजी म्हणाले, “लक्षात ठेव. येत्या पाच–सहा महिन्यात मी देहत्याग करीन. निरोप पाठवीन तेव्हा ये. उद्या मुंगेरला जा.”

मुंगेरला येऊन घोष साहेबांना सर्व सांगून फाईली शोधल्या. शंभर रुपयांचा प्रश्न तसाच होता. अचानक एक दिवस घोष साहेब आनंदाने ओरडले, “मुखर्जी सापडला, शंभर रुपयांचा हिशोब मिळाला.”

“कुठे व कसा सापडला?” घोष साहेब म्हणाले, काही दिवसांपूर्वी कार्यालयातल्या सामानाला रंग दिला. एका पेटीचा रंग ओला होता, शंभराची नोट तिथे चिकटून बसली. ही बघा ती नोट. तुमच्या गुरुजींनीबरोबर सांगितले होते. तुम्ही खूप भाग्यवान आहात की तुम्हाला असे महान गुरु मिळाले.

क्रमशः



अष्टावक्र गीता

(भाग ५)

अजित सर

अध्याय पहिला – (सूत्र ११)

मुक्ताभिमानी मुक्तो हि बध्दो बद्धाभिमान्यपि ।
किंवदन्तीह सत्येयं या मतिः सा गतिर्भवेत ॥

अर्थः मुक्तिचा अभिमानी मुक्त आहे आणि बंधनाचा अभिमानी बंधित आहे.
येथे हे ‘किंवदन्ती’ सत्य आहे कि जशी मति तशीच गति असते.

ह्या सूत्रात अष्टावक्र सांगत आहेत कि जशी माणसाची बुद्धी असते तशीच त्याची गति असते हे अध्यात्माचे सूत्र आहे. भगवान कृष्णांनी सुद्धा गीतेत सांगितले आहे कि अनासक्त पुरूष कर्म करताना सुद्धा परमपदाला प्राप्त होऊ शकतो. जनकादि ज्ञानी सुद्धा आसक्तिविरहित कर्मांच्या द्वारेच मोक्षाला पोहोचले (गीता ३/१९–२०). कर्म हे बंधन नसते, त्याच्या मागची आसक्ती, लोभ हीच बंधने आहेत. बंधनाच्या भयाने कर्माचा त्याग करणे हेच पाप आहे. ह्याचाच अर्थ पाप–पुण्य कर्मांवरती अवलंबून नसते तर त्या कर्माच्या आसक्तीवर अवलंबून असते. निष्काम कर्म कधीच बंधन होऊ शकत नाही. कर्माचे कारण शरीर नाही तर मन आहे, सुरूवातीला विचार येतात त्यातूनच कर्म बनते. त्यामुळे प्रत्येक कर्माच्या मागे विचार म्हणजेच मन असते. मृत्युनंतर शरीर तर सुटुन जाते परंतु मन मात्र आत्म्याबरोबरच फिरत असते. मनाबरोबरच इच्छा, वासना, आकांक्षा, अपेक्षा इत्यादि भटकत असतात. ह्याचाच अर्थ मन हेच बंधनाचे तसेच मुक्तीचेही कारण आहे.

ह्या सर्वांतून जर मुक्ती मिळवायची असेल तर आपल्याला मानावेच लागेल कि मी मुक्त आहे. ही कल्पनाच जर करता आली नाही तर मुक्तीची द्वारे आपल्याला कधीच उघडी होणार नाहीत. मानणे हे मनातूनच येत असते आणि मन जर स्वतःला बंधित मानत असेल तर अस्तित्व बंधितच होणार. आणि मनाच्या केवळ मानण्याने तर मन मुक्त होऊ शकते. मनाची ही अमर्याद सत्ता शिव संकल्प सूक्तांमधून सुद्धा मांडली गेली आहे.

अध्याय पहिला – (सूत्र १२)

आत्मा साक्षी विभुः पूर्ण एको मुक्तश्चिदक्रियः ।
असंगो निस्प्रुहः शांतो भ्रमात्संसारवानिव ॥

अर्थः आत्मा साक्षी आहे, व्यापक आहे, पूर्ण आहे, एक आहे आणि मुक्त आहे. तो चैतन्यस्वरूप आहे, क्रिया रहित आहे, असंग आहे, निस्पृह आहे, शांत आहे परंतु आपल्या भ्रमामुळे तो संसारी असल्यासारखे भासते.

आपण मुळातच आत्मा असल्याने त्याची प्राप्ति करण्याचे प्रयास व्यर्थ आहेत. तो मुळातच आपल्याला केवळ प्राप्तच नाही तर तो स्वतःच प्राप्य आहे. त्याला प्राप्त करण्याची इच्छा सुद्धा माणसाला आत्म्यापासून भिन्न करण्याची शक्यता आहे. आपल्या अज्ञानाने आपण स्वतःचे स्वरूपच विसरून गेलो आहोत. आपल्याला हे सातत्याने लक्षात ठेवायला हवे कि आत्मा हा साक्षी जगताचा स्वामी आहे. तो व्यापक आहे. विश्वात अशी एकही जागा नाही कि जेथे त्याचा संचार किंवा अस्तित्व नाही. तो पूर्ण आहे. त्यामुळे त्याला पूर्ण होण्यासाठी किंवा करण्यासाठी काहीच करायची गरज नाही. जीवनाच्या खेळात आत्मस्थानावर बसून जीवनाचा खेळ साक्षीभावाने आणि पूर्णत्वाने खेळणे आवश्यक आहे, किंबहुना प्रत्येक गुरू आपल्या शिष्याला हेच ज्ञान देतो कि तू मूलतःच पूर्ण आहेस. हे ज्ञान प्राप्त केल्यावर तो आपल्या शिष्याला आदेश देतो कि आता तू संसाराला लाग. आपण पूर्ण आहोत ही जाणिव एकदा का झाली कि मग पूर्णत्वासाठी कोणतीही प्रक्रिया करायची गरज पडत नाही. मग जीवनातील प्रत्येक क्रिया ही एक लीला बनते. जीवनातील प्रत्येक कर्म हेच कर्मयोग बनते. त्यामुळे अर्थातच जीवनाकडून कोठलीच अपेक्षा राहत नाही. साहाजिकच अपेक्षाभंगाचे दुःख आपल्याला स्पर्श करत नाही. मग नैराश्याचे नामोनिशाणच निघून जाते. आत्मा निस्पृह आहे. त्याला कशाचीच अपेक्षा नाही. त्याला स्वार्थ नाही. तो शांत आहे त्यामुळे अहंसारखा तो जीवनामध्ये संघर्षाला स्थान देऊ इच्छित नाही. तो निर्गुण आहे, निराकार आहे परंतु तरीही आपल्याच विक्षेपाने किंवा अज्ञानामुळे तो संसारात भाग घेत आहे असा विभ्रम तयार होत असतो.

अध्याय पहिला – (सूत्र १३)

कूटस्थं बोधमद्वैतमात्मानं परिभवय: ।
आभासोऽहं भ्रमम मुक्त्वा भावम बाह्यमथांतरम् ॥

अर्थ: मी आभास आहे, मी अहंकारी जीव आहे अशा बाह्य आणि आंतरिक भावाला किंवा आभासाला सोडून तू कूटस्थ (अचल) अशा बोधरूपि आणि अद्वैत आत्म्याचा आविष्कार आहेस असा विचार कर.

मनुष्याच्या बाह्य आणि आंतरिक असे दोन परिमिती असतात, माणसाचे बहिर्मुख हे नेहमीच बाहेरच्या संसाराला किंवा सृष्टीला अनुभवत असते. त्याला ध्यानात जाणे कठीण आहे, माणसाच्या आंतर्स्वरूपामध्ये तीन जगत असतात. एक विचार जगत, त्याच्या आत भाव जगत आणि तिसरे आत्म जगत किंवा साक्षी जगत. बुद्धीजीवी माणुस विचारांच्या जगात विहरत असतो. तो आपल्या विचारांना ध्यानाच्या मार्गे चैतन्य स्वरूपापर्यंत पोहोचवू शकतो. कृष्णाचा कर्मयोग, कपिल मुनींचा सांख्ययोग आणि नारद मुनींचा भक्तियोग हे आत्म जगतापर्यंत पोहचवणारे तीन मार्ग अध्यात्मात मुख्यत: मानले जातात. परंतु अष्टावक्र यांनी सांगितलेला मार्ग खूपच वेगळा आहे. ते म्हणतात माणसाला सरळ आत्म जगताकडे जाण्याचा मार्ग खूप सोपा आहे. ते कोणताही विधि किंवा प्रक्रिया न मानता सरळ मनाला आपल्या आत्मस्थितीचा अनुभव घ्यायला लावतात. त्यांना अध्यात्माच्या प्रक्रिया आणि कर्मकांडे म्हणजे निव्वळ वेळेचा अपव्यय वाटतो., आपण आत्मा आहोत हा केवळ एकच बोध मानवाला आपल्या आत्मस्थितीत नेऊ शकतो हे त्यांचे ठाम प्रतिपादन आहे.

येथे अष्टावक्र आत्म्याला कूटस्थ असे म्हणतात. कारण आत्मा स्थिर आहे, तो निश्चल आहे. तरीही तो शक्तिमान आहे. जसे एखाद्या चाकाच्या परिघाची गति त्याच्या केंद्रातून येत असते तसेच अस्तित्वाची गति ही आत्म्याच्याच केंद्रातून निघत असते, आत्म्याचा केंद्रबिंदू हाच सर्वत्र बाह्य जगताचा प्रेरणास्त्रोत आहे. अशा ह्या केंद्रबिंदूच्या स्थिरतेवरच बाह्य जगताचि गति अवलंबून असते, हा सृष्टीचा नियम आहे. अहंकार आणि आत्मा ह्या दोन पर्यायांमधील आत्म्याच्या पर्यायाला आपण जर स्विकारू शकलो तर आपण अनिर्बंध, असीम आणि अमर्याद शक्ति असल्याचा बोध आपल्याला सहजतेने होऊ शकतो.

अध्याय पहिला – (सूत्र १४)

देहाभिमानपाशेन चिरं बद्धोऽसि पुत्रक ।
बोधोऽहं ज्ञानखन्गेन तन्निष्कृत्य सुखी भव ॥

अर्थ: हे पुत्रा, तू बऱ्याच काळापासून देहाभिमानाच्या पाशात बांधला गेला आहेस. ह्या पाशाला "मी बोध आहे" ह्या तलवारीने तू कापून टाक व त्यातून तू मुक्त हो व सुखी हो.

शरीर हे सुद्धा आत्म्याचेच स्वरूप आहे जसे बुद्धी, मन, ह्रदय, स्मृति, अहं ही आत्म्याचीच रूपे आहेत. शरीर आत्म्यापेक्षा वेगळे नाही. परंतु शरीर एक वेगळे अस्तित्व आहे ही भ्रामक कल्पना तुला तुझ्या सुखाला वंचित करत आहे हे तू समज. शरीर हा दृश्य आत्मा आहे तर आत्मा हे अदृश्य शरीर आहे हे लक्षात ठेव. शरीराला आत्म्यापासून वेगळे करण्यामध्ये आपल्याच चित्तावरचे संस्कार कारणीभूत आहेत. आज्ञा चक्रातील बुद्धी, विशुद्धी चक्रातील मन आणि ह्रदयातील अंत:करण ह्या तिघांचे मिळून चित्त बनते. त्याच्या एका बाजूला मणिपूर चक्रात शरीर आहे तर दुसऱ्या बाजूला सहस्त्रार चक्रातील आत्मा. मधले चित्त ज्या वेळेला शुद्ध होईल त्याच वेळेला त्या पारदर्शक चित्तामधून शरीराला आत्म्याचे स्वरूप दिसते. अध्यात्माच्या बऱ्याचश्या प्रक्रियांमध्ये चित्तशुद्धीला म्हणूनच महत्व आहे, परंतु अष्टावक्र म्हणतात कि केवळ आत्मा हाच मूळ पुरूष आहे आणि मी त्याचाच भाग आहे हा बोधसुद्दा मनुष्याला मुक्तीकडे नेऊ शकतो.

तू पहिले का पुकारले नाहीस?

द्रौपदीचे वस्त्रहरण ही तशी पाहीली तर भारतिय संस्कृतिला कलंकीत करणारी, मान खाली घालायला लावणारी घटना. जेव्हा वस्त्रहरण सुरू झाले त्याक्षणी द्रौपदीचा आकांत झाला. आपल्या लज्जेचे रक्षण आता कसे करावे या विचारांनी व्याकुळ झालेल्या द्रौपदीने मग आपल्या पांच पतिराजांना पुकारले. पहिली पाळी अर्थातच धर्मराजाची आली. परंतु द्रौपदीची ही आर्त पुकार त्याक्षणी कौरवांचा दास बनलेल्या धर्माच्या हृदयात घुसली खरी परंतु धर्मराजाने आपली असहायता व्यक्त करून द्रौपदीची घोर निराशा केली. त्यानंतर अर्थातच सर्व शक्तीमान भीम, धनुर्धारी अर्जुन, नकुल आणि सहदेव या पांडवांना द्रौपदीने त्याच क्रमाने पुकारले खरे, परंतु त्यातीला एकानेही द्रौपदीच्या पुकारण्याला प्रतिसाद देण्याचे धैर्य दाखवले नाही. सगळेच शरमेने आणि असहायतेने आपल्या मुंड्या खाली घालून मुग गिळून बसले. द्रौपदीच्या आशा आता संपू लागल्या आणि तिने मग तेथील वृद्ध आणि ज्येष्ठ अशा भिष्माचार्य, कृपाचार्य आणि द्रोणाचार्यासारख्या अतिरथी महारथींची करूणा भाकली. डोळ्यांतून अश्रुंच्या धारा वाहवत ह्या तिघांनीही आपण कौरवांचे नोकर असल्याने त्यांचा मिठाला जागणे हे आपले कर्तव्य असल्याचे सांगत आपली असमर्थता व्यक्त केली. आता जणू द्रौपदीच्या माथ्यावर आभाळ कोसळू लागले. मदतीचे सगळे दरवाजे बंद भासू लागले आणि तिने प्रत्यक्ष कौरवांकडे याचना केली. महाराज धृतराष्ट्र जो आधीच पुत्रप्रेमाने आंधळा झाला होता त्याच्या हृदयाला पाझर फुटणे तर अशक्यच होते. पण आशा सुद्धा धृतराष्ट्रासारखी आंधळी असते. द्रौपदीने दुष्कर्मी दु:शासनाला आणि दुष्ट दुर्योधनाला सुद्धा आर्ततेने पुकारले. पण तेही व्यर्थच गेले. राक्षसी प्रवृत्ति त्यामुळे आणखीच बळावल्या. आता सगळ्या आशा संपल्या असे द्रौपदीला वाटले व तिच्या डोळ्यांपुढे अंधार पसरला. ती पूर्णत: असहाय्य झाली. त्याक्षणी तिच्या डोळ्यांसमोर भगवान कृष्णांचा चेहरा चमकून गेला व तिला अचानक आठवले कि आपण भगवान कृष्णांना पुकारलेच नाही. तिने कृष्णाच्या नावाने टाहोच फोडला. आणि एक मोठा चमत्कार त्या सभेत घडला. प्रत्यक्ष भगवान कृष्ण आपल्या पूर्ण सामर्थ्यानिशी तेथे प्रकटले आणि त्यांनी द्रौपदीला अनंत वस्त्रांचा पुरवठा करून तिच्या लज्जेचे रक्षण केले व त्या महाभयानक दुष्कृत्याचा शेवट झाला.

द्रौपदी त्या संकटातून निभावली खरी, पण तिला एक प्रश्न वारंवार सतावत होता. तिला तो प्रत्यक्ष कृष्णाला विचारायचा होता. या घटनेनंतर साधारण तीन महिन्यांनंतर द्रौपदी द्वारकेला जाऊन द्वारकाधीश कृष्णांना भेटली व तिने विचारले, “कृष्णा, एक प्रश्न विचारू?” भगवान कृष्ण नेहमीच्याच मिश्किलपणाने हसले आणि म्हणाले, “हो द्रौपदी, विचार ना” द्रौपदीने कृष्णांना विचारले, “भैय्या कृष्ण, त्या दुर्दैवी दिवशी तुम्ही आधीच का नाही आलात मला संकटातून वाचवायला?” कृष्ण हसले व म्हणाले, “अग द्रौपदी, तू आधीच का नाही ग पुकारलेस मला? तुला माझी आठवण नाही का आली? अग मी त्या सभागृहाच्या बाहेरच सज्ज होऊन उभा होतो. मला माहित होते हे असेच होणार. मला वाटले होते कि तू मला पुकारशील. पण तू तर पांडवांना पुकारलेस. मी स्वत:ला समजावले कि पतिंच्या नंतर मला पुकारशील, पण नंतर तू आचार्यांना पुकारलेस. पुन्हा माझी आशा बळावली. पण तू पुन्हा मला निराश केलेस. द्रौपदी लक्ष देऊन ऐक, तू मला जर पहिले पुकारले असतेस ना तर मी पहिलाच आलो असतो. तू शेवटी पुकारलेस, म्हणून शेवटी आलो. हे बघ द्रौपदी, पुकारणे हे तुझे कर्म आहे आणि येणे हा माझा धर्म आहे. हे कधीच विसरू नकोस.”

तात्पर्य: आपल्या आर्त पुकारण्याला परमेश्वर जरूर प्रतिसाद देतो. आपणच त्याला विसरतो. तो आपल्याला कधीच विसरत नसतो.



(लेखांक १८)

जाहल्या स्वामीराज वैद्य, व्याधी पळे आपणची...

महारोगी पंजाबी व एका वृद्ध वैष्णवाचा पोटशूळ बरा झाला

१७८६ मध्ये एक शरिराने उंच, बोलण्यात मोठा धीट परंतु महारोगाने पीडलेला असा पंजाबी माणूस अक्कलकोटात महाराजांच्या दर्शनाला आला. त्यावेळी श्री समर्थांची स्वारी अक्कलकोटात साखर विहीर आहे तेथे बसली होती. बरोबर सेवेकरी लोक होते. पोटशूळाने आजारी असलेला एक वृद्ध वैष्णव ब्राह्मण महाराजांसन्निध एका लिंबाच्या झाडाखाली बसला होता. आपली व्याधि समर्थांनी दूर करावी म्हणून त्याची प्रार्थना चालली होती. इतक्यात तो पंजाबी इसम दंडवत घालून पुढे उभा राहीला. “आप बहुत चमत्कार बताते हो यह श्रवण करके मै आया हूं।” हे त्याचे भाषण श्रवण करून श्री समर्थ त्यास मोठ्या रागाने म्हणाले, “चमत्कार बैठे +++ पर. चमत्कार गारूडीके खेलमे देखो. दही, बर्फी खाके रंडीकू +++ है और मगरमस्ती करता है. तेरेकू अच्छा रंडीके चमत्कार दिन रात दिखता है. और चमत्कार चहाये?” असे भाषण करून महाराजांनी आपली लंगोटी फेडून त्यास दाखविली. हे समर्थांचे सर्वज्ञपणाचे वाक्य ऐकताच तो दुष्कर्माचरणी मनुष्य मनातल्या मनातच विरमून तटस्थ उभा राहीला.

इतक्यात झाडाखाली पोटशूळाने ग्रस्त झालेल्या त्या ब्राह्मणाकडे बघून समर्थ म्हणाले, “का रे? आम्ही तुझ्या बापाचे काय लागतो. तू उगीच आम्हा संन्याशांजवळ का मरतोस? जा, हत्तीच्या लेंड्या आणि ह्या तुझ्या डोक्यावरील लिंबाचा पाला एकत्र करून खा.” समर्थांचे हे वाक्य त्या ब्राह्मणाने शिरसावंद्य करून लागलीच जाऊन त्याने ह्या दोन जिनसा एकत्र करून खाल्ल्या. समर्थांच्या कृपेने त्या ब्राह्मणास तत्काळ गुण आला. तेव्हा आपला फार दिवसाचा रोग श्रींचे चरण कृपेने तत्काळ नाहीसा झाला हे मनात येऊन ब्राह्मण श्री चरणांचे वरती लीन झाला. आणि दीनदयाळ भक्तवत्सल प्रभूंचा आपणास अनुग्रह व्हावा म्हणून चरणारविंदी विनंति केली. श्री स्वामी समर्थ हास्यवदन करून त्यास म्हणाले, “जा, कांद्याची बोंडे खा.” श्रीमुखातील हे प्रेमयुक्त भाषण ऐकून, वैष्णव ब्राह्मण कांद्याला शिवत नसून, त्यास समर्थ कांदे खा असे म्हणाले म्हणून सर्वत्रांना आश्चर्य वाटले. हे कृपावंतांचे मुखातील अनुग्रहाचे वचन श्रवण करून त्या वृद्ध वैष्णवास आनंद झाला. आणि श्री गुरूंचे अवतरण आम्हा दीनदासांचे उद्धारणार्थ झाले असे जाणून त्याने महाराजांची बहुत प्रकारे स्तुति केली.

यतिरपि विश्वकुटुंबी दृढवैराग्योपि रागवादिन्ये
भिक्षाश्यपि जगदीश चरितं चित्रं तदेतदाभाति ।

हा तत्कालीन घडलेला चमत्कार त्या पंजाबी मनुष्याने पाहून आणि आपल्या आंतस्थ दुष्कृति समर्थांनी सर्वज्ञपणाने जाणल्या हे सर्व मनात आणून तो अगदी लीन झाला व स्वकृतिचा मोठा पश्चाताप करू लागला. पुढे दोन महिने श्री समर्थांची सेवा करून श्रींच्या कृपेने तो महारोगापासून बरा होऊन तो परत स्वदेशी गेला.

(अक्कलकोट निवासी स्वामी महाराज यांचे चरित्र, (कै गणेश बल्लाळ मुळेकर) पृष्ठ १४०–१)

प्रकृती वन

निसर्गाला समर्पित एक जंगल

मूळ इंग्रजी लेखिका: यामिनी कुटुंबळे. (अनुवाद : मृणाल कुटुंबळे)

मनुष्याला ज्याची आवश्यकता आहे ते सर्वकाही निसर्गाकडे विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. भौतिक गोष्टींच्या हव्यासापायी मानवाने निसर्गाला गृहीत धरले. स्वत:च्या स्वार्थासाठी, भौतिक गरजांसाठी, मनुष्याने जंगलांचा विनाश केला. ह्या साऱ्या धुमश्चक्रित पशुपक्षी आणि इतर सजीवांना राहण्यासाठी आवश्यक अशा जंगलांचा विनाश झाला तसेच त्यांच्या प्रजाती नामशेष होऊ लागल्या. मनुष्याने शेती, मूलभूत सोयी, घरे बांधण्यासाठी वनांचे निकंदन केले, ज्या वनांचा आश्रय घेऊन पशुपक्षी आणि इतर सजीव जगत होते. म्हणून आपण जंगले आणि त्याच बरोबर पशु पक्षांची काळजी घेतली पाहिजे. ही पृथ्वी सुंदर आहे कारण इथे फक्त मनुष्यच नाही तर त्याच्यासोबत सर्व सजीव, निसर्ग ऐकमेकांसोबत नांदत आहेत.

मानवाच्या स्वार्थी अतिरेकाने अगदी निम्न स्तर गाठल्यामुळे ते निसर्गाला आणि त्याच्या सुंदरतेला हानिकारक ठरले आहे ही गोष्ट ह्या 'नोवेल कोरोना वायरस' मुळे आपल्यासमोर उघडकीस आली. त्यातून मानवाला फार मोठा धडा मिळाला आहे. सण, उत्सवांच्या दिवसांत शहरे विषारी धुराने भारलेली असतात. वाहतूक कोंडी, कारखान्यांमधून सोडला जाणारा धूर आपल्यासाठी नवा नाही. जेव्हा माणसे घरात बंदिस्त होती, तेव्हा मानवाच्या लोभाच्या अतिरेकामुळे निर्माण झालेल्या कहरापासून निसर्ग स्वत:ला सावरत होता. जेव्हापासून लॉकडाऊन अंमलात आला, म्हणजे मध्य मार्च, ज्या नैसर्गिक सुंदरतेचा अनुभव घ्यायला आपण मुकलो होतो अशा निळ्याशार आभाळाचा अनुभव आपण घेऊ शकलो.

'प्रकृती वन', वन विकसित करून निसर्गाला समर्पित करण्याची ही एक कल्पना आहे. अशी जागा जिथे मनुष्याने प्रवेश करू नये. ही जागा मनुष्याशिवाय सर्व सजीवांसाठी आहे. अशी जागा जिथे पशुपक्षी मुक्तपणे जगू शकतील. प्राचीनकाळी अशा वनाला 'देव–वन' पण म्हटले जात असे.

निसर्गाला आत्ता थोडयाशा झाडा–झुडापांची नाही पण हिरव्यागार घनदाट जंगलाची गरज आहे. डॉ.अकिरा मियावाकी (जपानचे वनस्पतीशास्त्रज्ञ) यांनी त्यांच्या प्रदेशात निसर्गातील वृक्षराजींनी समृध्द असलेल्या स्थानिक भू भागाचा अभ्यास केला आणि ३० वर्षांपेक्षाही अधिक काळ अभ्यास करून वृक्षारोपणाची एक नवीन पध्दत विकसित केली ज्यात आपण नैसर्गिक मूलद्रव्ये आणि जैविक वैविध्य असलेले जंगल विकसित करून ते टिकवू पण शकतो आणि हे सुध्दा अति अल्प काळात. मियावाकी पध्दतीचे हे वृक्षारोपण आहे ज्यात घनतेचे अनेक थर निर्माण करण्यासाठी स्थानिक प्रजातींचा उपयोग केला जातो. मियावाकी पध्दतीमध्ये कमीत कमी जागेत जास्तीत जास्त वृक्ष लागवड केली जाते. यामध्ये वृक्षांची आपापसामध्ये स्पर्धा आणि त्यांचे एकमेकांशी असलेल्या मैत्रीच्या नात्याला प्रोत्साहन दिले जाते. घनदाट जंगले तापमान कमी करण्यासाठी, जमीनीची फळद्रूपता वाढवण्यासाठी, स्थानीय वन्यजीवांचे संरक्षण आणि कार्बनडायोक्साईडचे प्रमाण कमी करण्यासाठी फायदेशीर आहेत.

मियावाकी पध्दत म्हणजे 'स्थानिक वृक्ष लागवडीतून निर्माण झालेले स्थानिक जंगल'. फक्त २० ते ३० वर्षात एक समृध्द, घनदाट आणि स्वसंरक्षणात कार्यक्षम असलेले जंगल तयार होते. जगाच्या अत्यंत घनदाट जंगलात १००० चौरसफुट विस्तारात ३००० ते ५००० झाडे असतात. म्हणजे दर चौरसफुट मध्ये ३ ते ५ झाडे. त्याचप्रमाणे आपण सुध्दा १०० चौरसफुटात ३०० ते ५०० झाडे लावून जंगलाचे निर्माण करू शकतो. अशा जंगलात सुदृढ प्राणी आणि वनस्पती विकसित होऊ शकतात. जगाच्या वेगवेगळ्या भागात ही पध्दत यशस्वीरीत्या अंमलात आणली गेली आहे. अल्प कालावधीत ही वने स्वत:च टिकाव धरतात. म्हणजे आपल्याला खूप वर्षांपर्यंत पाणी घालावे लागत नाही. इ.स. २०१५ मध्ये 'वॉशिंग्टन पोस्ट' नावाच्या वृत्तपत्रात एक लेख छापून आला होता – "निसर्गाचा अभ्यास". 'Nature' हे इंग्रजी बहु अनुशासनात्मक वैज्ञानिक दैनिकांपैकी एक सन्मानित दैनिक आहे. त्यानुसार भारतात प्रतिव्यक्ती फक्त २८ झाडे आहेत आणि ह्याचे सर्वाधिक प्रमाण कॅनेडा मध्ये आहे, जिथे प्रतिव्यक्ती ८९५३ झाडे आहेत. भारतात दर चौरस कि.मी. मध्ये ११,१०९ झाडे आहेत, फिनलॅंड मध्ये हा दर प्रती चौरस कि.मी. मध्ये ७२,६४४ झाडे असा आहे.

२०१७ मध्ये 'ग्रीनपीस इंडिया' ने एक अहवाल प्रकाशित केला होता, त्यानुसार प्रदुषणामुळे भारतात दरवर्षी १२ लाख मृत्यू होतात. दिल्ली हे भारताचे सर्वाधिक प्रदूषित शहर आहे. राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने संपूर्ण भारतभर हवा प्रदुषणाच्या गुणवत्तेचे मुल्यांकन केले असता १६८ शहरे, २४ राज्ये आणि संघटन प्रांतांचे मुल्यांकन केले. 'वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO)' या संस्थेने आखून दिलेल्या मापदंडाचे या १६८ शहरांपैकी एकही शहर पालन करत नाही.

मियावाकी जंगल अथवा 'प्रकृती वन' नैसर्गिक जंगलांचा कोणत्याही प्रकारे पर्याय नाही. झाडे आणि जंगले कापण्याचे समर्थन करण्यासाठी या वनांचा वापर केला जाऊ नये. नैसर्गिक जंगलांमध्ये विपुल प्रमाणात काही गुण, समृध्द नैसर्गिक प्रणाली असते. त्याचा पर्याय असूच शकत नाही पण असे वृक्षारोपण नैसर्गिक वनांना पूरक होते. जुनी जंगले हजारो वर्षे जुनी आहेत आणि त्यांना पुर्नस्थापित करणे शक्य नाही. जी वने आहेत तीच पुर्नस्थापित न करता, 'प्रकृती वन' हे नवीन वने निर्माण करण्याचा एक प्रयत्न आहे.

हीच ती वेळ आहे जेव्हा आपण सर्वांनी या गोष्टींचा गांभीर्याने विचार करून भविष्याच्या दृष्टीने सक्रीय पाऊले उचलायला हवीत. आपण जर पूर्वीसारखे निसर्गाला गृहीत धरून निष्क्रिय राहीलो, प्रदूषण वाढवत राहीलो तर अपेक्षेपेक्षा लवकर ह्या निसर्गाचा आणि पर्यायाने मानवजातीचा विध्वंस पाहावा लागेल. वृक्षारोपण, प्रदुषण मुक्ती, राहणीमानात बदल, अशी छोटी पाऊले उचलून जर ही स्थिती बदलणार असेल तर प्रयत्न करणे आपले कर्तव्य आहे.

ह्या दिवाळीत मला असे एक सुंदर प्रकृती वन पाहायला मिळाले. जे श्री सर्वजित परांजपे ह्यांनी त्यांच्या होमा थेरेपी गौशाळा, महेश्वर येथे विकसित केले आहे. ह्या वनाला प्रत्यक्ष पाहून त्याची माहीती घेतल्यावर मी मंत्रमुग्ध झाले. त्या वनाची छोटी प्रतिकृती ५*५ चौरस मीटर, ह्या आश्रमात ठेवलेली आहे. १२ जुलै २०१७ पासून त्यांनी ३०० पेक्षा जास्त स्थानिक तसेच अशी झाडे जी आश्रमात व्यवस्थित वाढू शकतील अशा २५ विविध जातींच्या झाडांची लागवड केली आहे. २ वर्षानंतर २०१९ मध्ये 'प्रकृती वन' संपूर्ण विकसित जंगल झाले आहे.

(संदर्भ: श्री सर्वजीत परांजपे. फाईव्हफोल्ड पाथ मिशन, महेश्वर, [इंदोर जवळ] मध्यप्रदेश)

स्वामी विवेकानंद आणि ध्यान

लेखांक १२वा

अनुवादक : श्री प्रांजल जोशी, पुणे

ध्यानाविषयी मार्गदर्शन (काही सूचना)

स्वामी विवेकानंद: ध्यान म्हणजे कोणत्याही एका गोष्टीवर मनाची एकाग्रता साधणे. हे शक्य झाले, तर मग तशी एकाग्रता इतर कोणत्याही गोष्टीवर साध्य होऊ शकते.

शिष्य: शास्त्रात दोन प्रकारच्या ध्यानांचा उल्लेख आढळतो. एक ज्यात एकाच गोष्टीवर (वस्तुवर) लक्ष केंद्रित करण्यावर भर आहे, तर दुसऱ्या प्रकारात "वस्तु विरहित" ध्यानाचे वर्णन केलेले आहे. या दोघांपैकी श्रेष्ठ ध्यान कोणते?

स्वामी विवेकानंद: साधनेच्या सुरुवातीच्या काळात ध्यान करण्याची प्रथम पध्दत उपयोगी ठरते. मनासमोर काही वस्तू घेऊन ध्यान करण्याचा सराव करणे सोपे जाते. मी सुरुवातीला एका काळ्या बिंदूवर माझे मन एकाग्र करीत असे. शेवटी शेवटी, मग बऱ्याच वेळा मला तो काळा ठिपका दिसतच नसे, किंवा तो माझ्या लक्षातही येत नसे. मनाचे जणू अस्तित्वच जाणवत नसे. एखाद्या लाटां विरहित समुद्रासारखे ते असायचे. कोणत्याही श्वासाशिवाय क्षण जात असायचे बहुतेक. त्या अवस्थेत मला अद्भुत सत्याची झलक जाणवली. म्हणून मला असे वाटते की अगदी काही क्षुल्लक बाह्य वस्तुवर वा गोष्टीवर ध्यान करण्याने मन एकाग्र होऊ शकते. आणि हे अगदी खरे आहे की ज्या गोष्टीने मनाला शांतता प्राप्त होते, अशा कोणत्याही गोष्टीवर ध्यान केल्याने मनाची एकाग्रता लवकर अन सहज साध्य करता येते. हेच तर खरे कारण आहे की आपल्या भारत देशात उपासनेसाठी देवी-देवतांच्या इतक्या वेगवेगळ्या प्रतिमांचे नियोजन केलेले आहे. वास्तविक उद्दिष्ट हेच आहे. मनाला शांत करायचे. त्याची चंचलता थांबवायची. मन कार्यविहीन करणे हेच वास्तविक उद्दिष्ट आहे. परंतु एकाच विषयात, गोष्टीत वा वस्तुत मन पूर्णपणे बुडून गेल्याशिवाय, मग्न झाल्याशिवाय हे शक्य नाही.

शिष्य: परंतु मन जर पूर्णपणे एखाद्या गोष्टीतच मग्न झाले तर मग ते आत्मसाक्षात्काराची, ब्रम्हज्ञानाची प्रचिती कसे घेऊ शकेल?

स्वामी विवेकानंद: घेऊ शकेल ना! सुरुवातीला मन त्या एकाच गोष्टीशी एकरुप होते, अन होता होता ती गोष्ट लुप्त होऊन जाते. मग उरतो, तो केवळ शुध्द अस्तित्वाचा अनुभव.

अद्भुत सिध्दी

स्वामीजी एकदा म्हणाले, "योग्य सरावाने काही प्रमाणात मानसिक एकाग्रता जमली तरी वेगवेगळ्या सिध्दी मिळवणे सहज शक्य आहे." असे बोलून आपल्या एका शिष्याकडे त्यांनी पाहीले आणि त्याला विचारले, "तुला शिकायचे आहे का? दुसऱ्याच्या मनातले विचार कसे वाचायचे ते? चार-पाच दिवसात सहज मी तुला शिकवू शकतो ते."

त्यावर तो शिष्य म्हणाला, "पण स्वामीजी, हे शिकून मला काय फायदा होईल?"

स्वामीजी म्हणाले, "काय फायदा म्हणजे? अरे इतरांची मने क्षणात जाणून घेण्यास तू सक्षम होशील."

शिष्य: माझ्या ज्ञानाची प्राप्ती करण्यास, माझ्या साधनेत त्याची मदत ठरेल का?



स्वामी विवेकानंद: बिलकुल नाही.

शिष्य: मग अजिबात मला ते विज्ञान शिकवू नका.

स्वामी विवेकानंद: श्री रामकृष्णांना देखील कधीच अश्या सिध्दींचा सोस नव्हता. त्यांनी आम्हाला देखील हीच शिकवण दिली की एकदा का मन अशा सिध्दींच्या अन चमत्काराच्या मागे पळाले, की आपल्या साधनेत, सत्याच्या शोधात ते मोठा अडाथळा ठरते. त्यामुळे त्याच्या नादी लागू नये. पण मानवी मन मात्र इतके नादान अन दुबळे असते की सामान्य संसारी लोक तर सोडाच, नव्वद टक्के साधु (भिक्षु) देखील या सिध्दींना भुलतात. इकडे परदेशात तर, अशाच चमत्कारांच्या मागेच लोक लागलेले असतात. श्रीरामकृष्ण खूप दयाळू, त्यांनी आम्हाला अगदी प्रेमाने शिकवले अन नेहमीच अशा गोष्टींपासून दूर राहण्याचे मनावर बिंबवले, त्यांच्यामुळेच या सिध्दी अन चमत्कार आमच्या अध्यात्मात अन साधनेत अडथळे आणु शकत नाहीत. तुझ्यादेखील ते लक्षात आले असेल, आम्ही श्रीरामकृष्णांची सर्व मुले या सिध्दींपासून कसे नेहमीच दूर असतो ते?

समाधीचे रहस्य

शिष्य: निर्विकल्प समाधीचा अनुभव घेऊन पुन्हा कोणी या द्वैताच्या जगात परत येऊ शकतो का?

स्वामी विवेकानंद: श्री रामकृष्ण नेहमी असे म्हणायचे की, जगाच्या कल्याणाकरीता परमेश्वरी अवतार समाधीच्या त्या अवस्थेतून पुन्हा या द्वैताच्या जगात येतात, पण सामान्य मनुष्यजीव तसे नाही करू शकत.

शिष्य: समाधीत मन विलीन होते आणि तिथे जर देहभानच हरपते, मनाचे देखील स्वतंत्र अस्तित्व राहत नाही, तर मग या द्वैताच्या जगात परत येणार तरी कसे? अहंची जाणीव नाही, मन देखील नाही, मग कोणतेच माध्यम शिल्लक राहत नाही. मग सनाधीमधून पुन्हा या जगात, या देहात येणार तरी कसे?

स्वामी विवेकानंद: हे बरोबर आहे की वेदांत हेच सांगते की एकदा का त्या समाधीच्या निर्विकल्प अवस्थेला गेले, की कशाचेच अस्तित्व उरत नाही आणि त्यामुळे पुन्हा त्या राज्यातून या राज्यात परत येता येत नाही. पण जगाच्या कल्याणासाठी परमेश्वरी अवतार काही इच्छा धरून, तो धागा पकडून पुन्हा अवतरतात, त्या निर्विकल्प अवस्थेतून पुन्हा खाली येतात.

आश्रम वार्ता

१. महिला आणि ताणतणाव –
बंगळुरूतील डी.आर. डी.ओ. – जी.टी. आर. इ. मधील व्याख्यान

बंगळुरू येथील संरक्षण मंत्रालयाखालील डिफेन्स रिसर्च आणि डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (D.R.D.O.) व गॅस टर्बाईन रिसर्च एस्टॅब्लिशमेंट (G.T.R.E.) ह्या संस्थांमधील महिला संघटनेसाठी गुरुजींनी 18 फेब्रुवारी 2021 रोजी महिला आणि ताणतणावाचे व्यवस्थापन या विषयावर एक व्याख्यान ऑनलाईन सभेत दिले. महिलांची चेतना आणि त्यांचा स्वधर्म याचे साकल्याने विवेचन करून महिलांना आपल्या आंतरिक व्यक्तिमत्वाचे पैलु जागृत करून एका आनंदमयी समाजाची निर्मिति करण्याचे आवाहन केले, साधारण 100 वैज्ञानिक महिलांनी ह्या सभेत भाग घेतला.

२. रेकि आणि महिला ह्या विषयावर राजकोट
येथील कृपा चोक्सी यांचे व्याख्यान



महिला आणि त्यांच्या आयुष्यातील रेकि साधनेचे महत्व या विषयावर गुजरातेतील राजकोट येथे रेकि विद्या निकेतनच्या रेकि प्रशिक्षक कृपा चोक्सी यांचे ऑनलाईन व्याख्यान दिनांक ११ फेब्रुवारी २०२१ रोजी आयोजित केले होते. रेकि साधनेमुळे संसारात आपले चैतन्य सातत्याने सतेज ठेवण्यास कशी मदत होते व संसारातील बऱ्याचश्या भूमिका तणावाशिवाय कशा छान निभावता येतात याचे विवेचन कृपा दीदींनी केले.

३. राजकोट येथील लावण्य क्लब येथील ऑनलाईन व्याख्यान

दिनांक 12 फेब्रुवारी 2021 रोजी राजकोट येथील लावण्य क्लब येथे रेकि शिक्षिका कृपा चोक्सी यांचे व्याख्यान आयोजित केले गेले होते. त्या व्याख्यानात रेकीचे जीवनावश्यक पैलु समजावून देतानाच रेकिमुळे जीवनात आनंदाचे तसेच स्वास्थ्याचे वातावरण कसे निर्माण करता येते याचा उहापोह कृपा दीदींनी करत श्रोत्यांची दाद घेतली.

४. योगाद्वारे लठ्ठपणा आणि वजन व्यवस्थापन यावर डि.एस.पी.पी.एल. चे शिबिर

देवरूख स्पिरिट्युअल प्रॉवेस प्रा. लि. या संस्थेतर्फे नुकतेच १५ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२१ दरम्यान एक ऑनलाईन योग शिबिर, संस्थेच्या योग प्रशिक्षक कु. अजिथा सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले गेले होते. ह्या प्रशिक्षणाचा लाभ घेतलेल्या साधकांना हे शिबिर अतिशय उपयुक्त वाटले व अजिथाताईंनी दाखवलेल्या मार्गाने आपण वाटचाल करून स्वत:ला स्वस्थ आणि तंदुरुस्त ठेवू असा निर्धार त्या साधकांनी व्यक्त केला. सूक्ष्म क्रिया, आसने आणि प्राणायाम यांचा अंतर्भाव असलेल्या ह्या शिबिराचे आयोजन अतिशय उत्तम रितीने केले गेले.

५. अष्टांगयोग इंस्टीटयूट ऑफ योग (योग अभ्यास वर्ग) ठाणे, येथील गुरूजींचे व्याख्यान

११ जानेवारी २०२१ रोजी बडोद्यातील प्रख्यात जी.एस्.एफ. सी. ह्या मोठ्या कंपनीत गुरूजींची दोन व्याख्याने झाली. त्यातील पहिले जी.एस्.एफ. सी. शाळेच्या साधारण ८० शिक्षकांचे प्रशिक्षण सकाळच्या प्रहरामध्ये घेण्यात आले. वटवृक्षाखाली बसून गुरूजींनी शिक्षकांचे घेतलेले प्रशिक्षण शिबिर अभिनव होते. ३ तास चाललेल्या ह्या शिबिराला शिक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला व गुरूजींची अशी शिबिरे वारंवार व्हावीत असा हट्ट शिक्षक वर्गाने व्यवस्थापनाकडे केला आहे. दुपारच्या वेळात त्याच कंपनीतील महिला क्लब ह्या संस्थेतील महिला सदस्यांसाठी महिलांचे प्रश्न व रेकि ह्या विषयावर प्रबोधन झाले.



आश्रम स्पंदन

श्री स्वामी समर्थ हे नेहमीच कर्मकांडांच्या विरोधात असत. उगीचच अंधश्रद्धा म्हणून कर्मकांडे करणे स्वामींना रूचत नसे. प्रत्यक्ष परमचेतनेच्या सन्निध्यात राहून सुद्धा लोकांनी देवाच्या गुणारूपांत गुंतावे हे त्यांना फारसे पटत नसे. परंतु साधकाच्या एका अवस्थेपर्यंत त्याने किंवा तिने कर्मकांडे करत राहणे त्यांना गैर वाटत नसे. आपण सगळेच जाणतो कि माणसाचे आयुष्य जसे त्याच्या पंचरूपात सामावलेले असते शारिरिक, भावनिक, मानसिक, बौधिक आणि अध्यात्मिक तसेच त्याची साधना ह्याच पंचरूपातून पुढे जायला हवी. कर्मकांडे ही शारीरिक साधनेची प्रतिके आहेत. यज्ञ-याग, पूजा-पाठ, नामस्मरण वगैरे साधनेच्या मार्गांना आपण कर्मयोग म्हणू शकतो जिथे शरीराची गरज असते. परंतु साधकाच्या साधनेची पातळी नंतर देह भावापलिकडे जाऊन भक्तीयोगाच्या दिशेने वळायला हवी. मग त्यात सेवा आली, सत्संग आले, पुराणांची पठणे आली. त्या नंतरची अवस्था म्हणजे मानसिक साधना. येथे मग ध्यान, धारणा, किंवा अगदी नियत साधनेतील उपनिषदांचा अभ्यास आवश्यक आहे. माणसाची चेतना त्यानंतर त्याच्या आज्ञा चक्राच्या स्तरावर पोहोचली कि मग उपनिषदे बाजूला पडतात आणि त्याचा वेदाभ्यास सुरू होतो आणि तो प्रज्ञेच्या क्षेत्रात प्रवेश करतो. त्यानंतर अर्थातच आत्मस्थानावर समाधि साधनाची गरज त्याला भासू लागते. हाच अध्यात्माच्या क्षेत्रातला राजमार्ग. परंतु साधनेच्या वरच्या पायऱ्यांवर पोहोचलेला साधक किंवा शिष्य अजूनही कर्मकांडांचा त्याग करत नाही असे लक्षात आले कि स्वामी त्याला माती चिवडणारा म्हणायचे. एखाद्या विमानाने अथांग आकाशात भराऱ्या मारणे सोडून जमिनीवरच फिरावे तशी ही साधकाची अवस्था.

आगामी उपक्रम: रेकि शिबिरे

दिनांक	रेकि शिक्षक	केंद्र/स्थान	श्रेणी	नोंदणीसाठी संपर्क
६ व ७ मार्च	कल्पिता कीर	गोवा (माशेल)	१ ली	नेत्रा गवस (९४२२६४३१०६)
६ व ७ मार्च	विशाल श्रीधनकर	गोवा (माशेल)	२ री	नेत्रा गवस (९४२२६४३१०६)
६ व ७ मार्च	अजित सर/राकेश	ठाणे	२ री	गिरीश कर्णिक (९८२०२६०२२९)
१७ व १८ मार्च	कल्पिता / विशाल	करूळ	१ ली	गिरीश कर्णिक (९८२०२६०२२९)
२० व २१ मार्च	विशाल / कल्पिता	कुडाळ	१ ली	प्रकाश भोगटे (८९५६५०२०३९)
२० व २१ मार्च	अजित सर/राकेश	नाशिक	१ ली	मोनाली राक्षे (९४२०६९२१३६)
२० व २१ मार्च	सीमा त्रिवेदी	राजकोट	१ ली	ज्योति सरैय्या (९८२४२९९१५३)
२० व २१ मार्च	भारतीबेन	अहमदाबाद	१ ली	किनल पंड्या (९७१४५१५८३९)
२७ व २८ मार्च	अजित सर	बडोदा	२ री	चंद्रेशभाई परमार (९९७४७०१२००)